# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ११/०९/२०२४ (बुधवार) सायंकाळ**

---

## अवैध दारूची तस्करी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक १०/०९/२०२४ रोजी पोस्टे एमआयडीसी बोरी येथील स्टाफ पोस्टे हद्‌दीत पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, केदार कॉलनी वार्ड क्र. ०२ एमआयडीसी बोरी येथे **आरोपी राकेश शांतारामजी वारे, वय २९ वर्ष, रा. केदार कॉलनी वार्ड क्र. ०२ एमआयडीसी बोरी** हा आपल्या घरात अवैद्यरीत्या विनापरवाना दारू बाळगुन विक्री करीत आहे. अशा माहिती वरून रेड कारवाई करून दारूबाबत आरोपीच्या घराची घरझडती घेतली असता घराच्या आतील खोलीत एका बोरीमध्ये १९२ निपा देशि दारू भिंगरी १८० मिली प्रत्येकी किंमती ७० रू. प्रमाणे एकुण १३४४०/— रूपयाचा मुद्‌देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरूद्ध पोस्टे एमआयडीसी बोरी येथे कलम ६५ ई मदाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे एमआयडीसी बोरी येथील ठाणेदार पोनि सतिशसिंग राजपूत, पोउपनि सुशिल सरकार, पोलीस अंमलदार दिलीप नवले, उज्वल कोठे, प्रतीक पारटवार, महिला पोलीस अंमलदार योगिता तुमसरे यांनी पार पाडली.

## पो.स्टे. नरखेड हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड
## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक १०/०९/२०२४ रोजी पोस्टे नरखेड येथील स्टाफ पोस्टे हद्‌दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, पोलीस स्टेशन नरखेड हद्दीतील मौजा मानिकवाडा शिवारात काही लोक ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती पोस्टे नरखेड येथील स्टाफ यांना प्राप्त झाले वरून सदर स्टाफ यांनी मौजा मानिकवाडा शिवार येथे सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे— १) भरतसिंग ओंकारसिंग चौहान, वय ३० वर्ष रा. बेलोना २) कमलाकर भाऊराव बारमासे वय २३ वर्ष रा. बेलोना ३) धनराज उकंडराव चरपे, वय २५ वर्ष रा. बेलोना ४) शुभम रमेश सातपुते, वय २३ वर्ष रा. नरखेड** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०४ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन नगदी ७८५०/— रुपये व ५२ तासपत्ते तसेच हिरो कंपनीची मो.सा. क्र. एम.एच.—४०/सि.आर.—८१८५ असा एकुण ७२,८५०/— रु. चा मुद्‌देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे नरखेड येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे नरखेड येथील ठाणेदार सपोनि अजित कदम, पोलीस उपनिरीक्षक देविदास ठमके, पोना स्वप्नील बोंडे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर